
आधुनिक विचारांचे
# वर्तमान
बीड । मंगळवार, १२ जानेवारी २०२१ । वर्ष : ३
आपले वृत्तपत्र, आपला आवाज
अंक : १२ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांच्या गाडीला अपघात; पत्नीचा मृत्यू



पणजी : केंद्रीय आयुष मंत्री श्रीपाद नाईक हे सपत्नीक गोकर्ण येथे जात असताना त्यांच्या गाडीला उत्तर कन्नड जिल्ह्यात अकोला येथे भीषण अपघात झाला. या अपघातात त्यांच्या पत्नी विजया आणि त्यांचे स्वीय सहाय्यक यांचा जागीच मृत्यू झाला. तर श्रीपाद नाईक यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांची परिस्थिती गंभीर असून रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



## संपादकीय

# जबाबदारीचे हवे भान

कोरोना काळात प्रत्येकाने आपापली जबाबदारी ओळखून काम करणे क्रमप्राप्त आहे. पोर्तुगालमध्ये एका नर्सचा मृत्यू झाला. तिचा मृत्यू कोरोनामुळे झाला असता तर ते तेवढे धक्कादायक कदाचित वाटले नसते. मात्र, हा मृत्यू करोना विरोधी लस घेतल्यानंतर झाला आहे. ही बाब चिंता वाढवणारी आहे. संबंधित महिला आपल्या भाषेत 'कोरोना योद्धा' होती. अर्थात, आरोग्य क्षेत्रात काम करणारी होती. ज्या देशांत लसीकरणाची मोहीम सुरू झाली किंवा होणार आहे, त्या देशांत वर्गवारीत आरोग्य क्षेत्राचा पहिला क्रमांक लागला आहे. ते आवश्यकही होते. त्याला कारण गेले वर्षभर हे लोक वेड्यासारखे काम करत आहेत. पर्सनल लाइफ संपल्यातच जमा झाले आहे. येणारा पॉझिटिव्ह रुग्ण, त्याचे उपचार आणि सोबतच स्वत:ची काळजी हाच यांचा वर्षभरातला दिनक्रम. त्यातही काहींना कोरोनाने गाठले. काहींचा बळीही गेला. तरीही मंडळींनी दिवसरात्र कोरोनाशी दोन हात केले. संशोधक मंडळींचीही तीच स्थिती. आता लस आली किंवा आल्या. अनेक देशांनी आणि कंपन्यांनी तसा दावा केला. त्यामुळे दिलासा मिळाला. लसीकरणाची प्रक्रिया सुरूही झाली. त्यानंतर म्हणजे लस दिल्यावर महिलेचा मृत्यू होत असेल तर ते हादरवणारे आहे. आलेल्या बातम्यांनुसार तिला कोणता आजार नव्हता. लस घेतल्यानंतर ती दोन दिवस बरी होती. नंतर अचानक तिचा मृत्यू झाला. झाल्या प्रकारामुळे लसीच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे दुर्दैवाने अशा आणखी काही घटना घडल्या तर त्याची जबाबदारी कोणावर राहणार, हा मुद्दाही आता विचारात घ्यावा लागणार आहे. किंबहुना आता तसे प्रश्नही विचारले जाऊ लागले आहेत. मरण पावलेल्या सोनिया ऍसिवेडोचे वय ४१ होते. करोनात आतापर्यंत ज्येष्ठांचा जास्त घात झाला आहे. सोनिया त्या वयोगटात नव्हती. कोणती सहव्याधीही नसल्याचे सांगितले जाते आहे. मग हा मृत्यू अपघात, दुर्घटना, त्रुटी आहे की अन्य काही? जागतिक समुदायाकडून त्यावर चर्चा सुरू झाली असली तरी त्यावर उत्तर येण्यास बराच काळ जाण्याची शक्यता आहे. शिवाय नेमके कारण समजले, तरी ते खरे असणारच याचीही शाश्वती नाही. कारण खरे कारण आता या स्टेजला समोर येऊ दिले जाणार का, हाच खरा प्रश्न. आज जगातल्या कोणत्याही देशाचे सरकार अथवा सरकारे अगतिक झाली आहे. करोनाचा खेळ काय आणि कसा चालतो याचा सगळ्यांनी गेल्या वर्षभरात अनुभव घेतला आहे. त्याचा प्रसाराचा वेग, उपचारासाठी लागणाऱ्या सुविधा, मनुष्यबळ, भीती अशा सगळ्याच अंगांनी आपल्या मर्यादा काय आहेत ते करोनाने आपल्याला दाखवून दिले आहे. गरीब राष्ट्रांचा तर विचार नाहीच. मात्र, संपन्न राष्ट्रांच्या तथाकथित पंचतारांकीत आरोग्य सुविधाही रुग्णांना सामावून घेण्यास कमी पडल्या. माणसे गेली कारण त्यांना वेळीच उपचार मिळू शकले नाहीत. थोड्याफार फरकाने प्रत्येक देशात हा प्रकार घडला. हे सगळे त्या अगतिकतेमागचे कारण. लस हवी आहेच. तिचा जोमाने शोधही सुरू असताना विषाणूनेही आपली संरचना बदलली आहे. ज्याला अगोदर चिनी व्हायरस म्हटले जात होते, त्याचा आता ब्रिटिश अवतारही दाखल झाला आहे. त्याचाही अन्य देशांत प्रसार झाला आहे. त्याची खिरापत भारतातही पोहोचली आहे. या पार्श्वभूमीवर करोनाच्या ज्या लसी तयार आहेत त्या नव्या विषाणूवर उपयुक्त ठरणार का, ही आणखी एक काळजी. आता एका आरोग्य कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर सुरक्षितताही चिंता निर्माण करणारी ठरली आहे. मुळात लस निर्माण करणे हा काही २०-ट्वेंटीचा सामना नाही. लसीकरण सुरू करण्याच्या अगोदर चाचण्यांच्या अनेक टप्प्यांतून जावे लागते. मानवी शरीरावर त्याचे काही दुष्परिणाम होणार नाहीत ना, याचा अभ्यास-निरीक्षण करावे लागते. ते एका दिवसांत होत नाही. त्याकरता निसर्गत: काही काळ वाट पाहावी लागते. महिना-दोन महिने किंवा काही वर्षेसुद्धा त्यासाठी थांबावे लागते. तेव्हा संबंधित लस पूर्णत: धोकाविरहीत आहे, असे सांगता येऊ शकते. करोनाच्या बाबतीत तेवढी उसंत मिळालेली नाही. किंबहुना तिसऱ्या टप्प्यांतील चाचण्यांचे निष्कर्षच समोर आलेले नाहीत. आपत्कालीन मंजुरीच्या नावे मोहीम सुरू करण्यात आल्या आहेत. घबराट कमी करण्यासाठी राष्ट्रप्रमुख मंडळींनी लाइव्ह लसी टोचून घेतल्याचेही आपण पाहिले. मध्यंतरी चाचणीसाठी निवड झालेल्या मात्र नंतर कथित दुष्परिणाम झालेल्या एका भारतीयाने काही आरोप केले होते. त्याचे पुढे काय झाले ते समोर आलेले नाही. आपत्कालीन स्थितीत आणि मानव कल्याणाच्या ढालीमागे जर एखाद्या दुर्घटनेत लस बनवणाऱ्या कंपनीने जबाबदारी स्वीकारलीच नाही तर त्याची जबाबदारी कोणाची? सरकार मग ते कोणत्याही देशाचे असो जबाबदारी स्वीकारणार का? एखाद्याने दावाच करायचा म्हटला तर भौगौलिक हद्दींचे अडथळे नसणार का? निष्कर्ष येण्यापूर्वीच लसीकरणाचा हा संपूर्ण टप्पा एक प्रयोग म्हणूनच राबवला जातो आहे का, असे अनेक गंभीर आणि विचार करण्यास प्रवृत्त करणारे प्रश्न आहे. स्वाइन फ्लूच्या वेळेसही असेच झाले होते. त्याच्यावर उपचार म्हणून जे दिले जात होते, त्याची उपयुक्तता काय आहे याची खरी माहिती नंतर लक्षात आली होती. जागतिक आरोग्य संघटना आणि लसींचे सगळ्याच देशांना समान वितरण व्हावे यासाठी स्थापन झालेली एक संस्था यांची यात मोठी जबाबदारी आहे. मात्र, त्यांना देश किती जुमानतील तेही एक कोडेच आहे. जागतिक आरोग्य संघटनेला करोनाचे उगमस्थान पाहायचे आहे. मात्र त्याकरता त्यांच्या तज्ज्ञांच्या पथकाला एन्ट्री द्यायलाच अद्याप चीनची तयारी नाही. करोनाचे भय, त्याचे अर्थकारण, त्याच्या नावाने होत असलेला व्यापार, लस तयार करण्यासाठी सुरू झालेली स्पर्धा आणि त्यानंतर केले गेलेले यशाचे दावे क्षणभर बाजूला ठेवू. संपूर्ण जगाचे लसीकरण व्हायला अजून किमान चार वर्षे लागतील, हेही मान्य करू. मात्र, त्यानंतर तरी करोनाचे उच्चाटन झाले असेल का? कारण वर्षभराच्या आतच जर विषाणू स्वरूप बदलतो आहे आणि तयार लस त्याचा बिमोड करण्यास सक्षम आहे, हेच जर अद्याप स्पष्ट झाले नसेल तर पुढच्या चार वर्षात करोनाने दशावतार दाखवले तर काय? लसीकरणानंतर अचानक उद्‌भवणाऱ्या समस्यांच्या संदर्भात विश्व म्हणून काही अभ्यास, शक्यता पडताळून पाहिल्या गेल्या आहेत का? हेही आता स्पष्ट करावे लागणार आहे.

# सरकारी अधिकारीच का व्हावं?

**आज आम्ही गावोगावी व्याख्यानं देत फिरतो. दिसेल त्या विषयावर लिहितो पण एका क्षणी लक्षात येतं की इतकं करून हातात काही उरत नाही. आपण ही हवाई फवारणी करण्यापेक्षा एकाच ठिकाणी ठिबक सिंचन करायला हवं होतं असं वाटून जातं. अधिकारी होण्यात हे ठिबक सिंचन करण्याची खूप मोठी संधी आहे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर दिलेलं हेरंब कुलकर्णी यांचं हे फेसबुकवर टाकलेलं भाषण.**

**गेस्ट कॉलम**

**हेरंब कुलकर्णी**

खरं तर शिक्षणात काम करणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला या स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या मुलामुलींना शुभेच्छा देण्यासाठी का बोलावलंय असा प्रश्न मला पडलाय. पण कॉलेजमधे असताना जसं प्रत्येक जण एकतर्फी किंवा दुतर्फी प्रेमात पडलेलाच असतो, तसंच त्या दिवसात एकदा कोणती तरी स्पर्धा परीक्षाही दिलेली असते. स्टाफ सिलेक्शनची अशी एक परीक्षा मीही दिली होती. आपण नेमकं या उत्तरावर का खुणा करतोय हे शेवटपर्यंत समजलं नाही. आपल्याला खूप माहितीय या अहंकाराचा फुगा फोडून मी बाहेर आलो. परत त्या वाटेला गेलो नाही. तेव्हा स्पर्धा परीक्षांकडून प्रेमभंग झालेल्यांचा प्रतिनिधी म्हणून बहुधा मला इथं बोलावलं असावं.



**अधिकार नसताना प्रबोधनाला मर्यादा**

स्पर्धा परीक्षा ज्यांना जमत नाही ते कोल्हयाला द्राक्ष आंबट या थाटात या परीक्षांविषयी नकारार्थी बोलत राहतात. मला आठवतं की, कॉलेजमधे असताना मी माझ्या एका मित्राला पत्र लिहिलं होतं आणि मला नोकरीतल्या अधिकारातल्या पैशाचं आकर्षण नाही असं लिहिलं. ती एक वैराग्याची झिंग असते पण आज शिक्षक झालो त्यात नक्कीच ध्येयवाद असला तरीसुद्धा एक मर्यादाही जाणवते की आपल्यासारखी माणसं लिहू शकतात. अगदी शिक्षणमंत्र्यांना काही सांगू शकतात पण शेजारच्या वर्गातल्या शिक्षकाला काही सांगू शकण्याचे अधिकार आपल्याला नाहीत. अशावेळी प्रबोधनाच्या या मर्यादाही जाणवतात. किमान अधिकारी होऊन एका जिल्ह्याला तरी दिशा देऊ शकलो असतो असंही मला आज वाटून जातं. आज आम्ही गावोगावी व्याख्यानं देत फिरतो. दिसेल त्या विषयावर लिहितो पण एका क्षणी लक्षात येतं की इतकं करून हातात काही उरत नाही. आपण ही हवाई फवारणी करण्यापेक्षा एकाच ठिकाणी ठिबक सिंचन करायला हवं होतं असं वाटून जातं. अधिकारी होण्यात हे ठिबक सिंचन करण्याची खूप मोठी संधी आहे. जगातल्या खूप मोठ्या प्रश्नांना हात घालण्यापेक्षा समोरच्या दिसणाऱ्या प्रश्नांना भिडण्याची आणि ते सोडवण्याची संधी, त्यातून मिळणारं समाधान खूप मोठं आहे.

हातात अधिकार नसताना केलेल्या प्रबोधनाला खूप मर्यादा असतात. अशावेळी एका मर्यादित क्षेत्रात केलेलं अमर्याद काम करण्याची ही संधी मला खूप महत्त्वाची वाटतं. लेखक, कवी, पत्रकार होण्याला जास्त ग्लॅमर असल्यानं ते करियर करावं की, अधिकारी व्हावं असं द्वंद्व मनात अनेकांच्या येईल पण समाजमान्यता लेखक, कवीला जास्त असेल पण म्हणून अधिकारी होण्याला कमी समजण्याचं कारण नाही. एक अधिकारी होऊन काही प्रश्न सोडवण्यातसुद्धा एक निर्मिती असते. समाधान असतं. एखाद्या आयुष्याला आपल्या धोरणातून न्याय देणं एखाद्या कवितेपेक्षा नक्कीच कमी नसतं.

**सरकार नावाच्या संस्थेचं काम**

अधिकारी वर्गाशी बोलताना मला आणखी एक न्यूनगंड जाणवतो की, त्यांना सामाजिक कार्यकर्त्यांचं खूप आकर्षण असतं. सामाजिक संस्थांचं सरकारपेक्षा जास्त कौतुक असतं. त्या न्यूनगंडातून ते सामाजिक संस्थांना जास्त झुकतं माप देतात आणि कधीकधी स्वत: राजीनामा देऊन सामाजिक संस्था सुरू करतात. पण अधिकारी होताना एक स्पष्टता आवश्यक आहे म्हणजे न्यूनगंड येणार नाही. शासकीय यंत्रणेविषयी माझं अर्थातच वाईट मत आहे.

मी तर थेट ग्राहकांच्या हातात वाउचर द्यावेत या मताचा पुरस्कार करणारा आहे. तरी हे मोकळेपणानं मान्य केलं पाहिजे की या देशात सरकार नावाच्या सामाजिक संस्थेनं जितकं प्रचंड काम केलं तितकं काम कोणतीच सामाजिक संस्था करू शकली नाही. मी शाळाबाह्य मुलांविषयी अभ्यास करतो पण शाळा, शिक्षक यांच्यावर कितीही टीकात्मक बोलताना माझ्या पुस्तकात, लेखनात मी अनेकदा मांडतो की, शाळांनी जितकी मुलं दाखल केलीत तितकी मुलं कोणतीच एनजीओ दाखल करू शकली नाही.

शाळाबाह्य मुलं दाखल केल्यावर त्याच्यासाठी एक ब्रिज कोर्स असतो. गडचिरोली जिल्ह्यात अशा ३२ शाळांतून २००६ साली ७०० मुलं मी बघितली होती. यवतमाळ जिल्ह्यात तर एक वेठबिगार म्हणून बापाने मालकाकडे ठेवलेला मुलगा शिक्षकांनी सोडवून आणलेला मी या शाळेत बघितला तेव्हा शहारलो होतो. सरकारी यंत्रणेद्वारे हे खूप शांतपणे होतं पण त्याचं कुठंही कौतुक होत नाही.

**एनजीओ सरकारला पर्याय नाही**

एका एनजीओने जर असा मुलगा सोडवला असता तर केवढा गाजावाजा झाला असता. तीच गोष्ट आरोग्याची आहे. देवीचा रोगी किंवा पोलिओ मोहीम या देशव्यापी मोहिमा केवळ सरकार नावाची एक अजस्र यंत्रणाच घडवू शकली. एनजीओचा रोल केवळ फोटो पुरताच पूरक राहिला पण आपली माध्यमं, आपले मंत्री एनजीओच्या सामाजिक कामाचं जितकं कौतुक करतात तितकं सरकारी यंत्रणेचं कधीही करत नाहीत. त्यातून तरुण वयात अधिकारी होण्यापेक्षा आपण सामाजिक कार्यकर्ते व्हावं असंच वाटायला लागतं. ही स्पष्टता असेल तर हा भ्रम होणार नाही आणि अधिकारी होण्याकडेच कल राहील. शेवटी जीवनसत्व ही जेवणातूनच मिळाली पाहिजे आणि जर ती मिळाली नाही तर ती औषधातून द्यावी लागतात. त्याचप्रमाणे सरकारी यंत्रणा हाच प्रश्न सोडवायचा मुख्य प्रवाह आहे. तो जिथे प्रभावी काम करत नाही त्या स्पेसमधे एनजीओ काम करतात. तेव्हा मुख्य प्रवाहात काम करण्याची जास्त गरज आहे. एनजीओ हा सरकारला पर्याय होऊ शकत नाही आणि आपल्या एनजीओसुद्धा सरकारी यंत्रणा सुधारण्यापेक्षा सरकारला पर्याय बनण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात.

**कल्पनेकडचं एक जग**

एखाद्या जिल्ह्यातलं सरकारी हॉस्पिटल चांगलं चालावं यासाठी दबावगट निर्माण करण्यापेक्षा स्वत:चं हॉस्पिटल काढणं त्यांना महत्त्वाचं वाटतं. अधिकारी झाल्यावर सामाजिक बांधिलकी जपता येईल का? हा आजचा विषय आहे. माझी चिंता ही आहे की मागच्या पिढीत जी गरिबांविषयी कणव अनेकात असायची ती आज वेगाने कमी होतेय. मागच्या पिढ्यांपूर्वी अनेकांनी उपाशी राहण्याचा अनुभव घेतला होता. गावातलं सर्वाचं एकूण उत्पन्न जवळपास सारखंच असायचं. त्यामुळे गरीब नसणाऱ्यांनाही गरिबांचं भावविश्व माहीत असायचं. माझ्या पिढीत नागरीकरण खूप वेगानं वाढलं. एकाच गावात भारत आणि इंडिया स्पष्टपणे जाणवायला लागलं. ऐपतीप्रमाणे शाळा ही वेगळ्या झाल्या. त्यापेक्षा ही शहरी भागात तर मध्यमवर्गीय उच्च मध्यमवर्गीय जीवनशैलीत तर ही गरीबी ही अनुभवणं दिसायलाही तयार नाही. पुन्हा जागतिकीकरणाच्या वेगवान प्रवाहात प्रत्यक्षात गरिबी हटली नसेल पण ती माध्यमातून, मनोरंजनातून नक्कीच हातळली आहे. पूर्वी चित्रपटाचा नायक हा झोपडपट्टीतला असायचा. अमिताभ ते राजकपूर या नाहीरे वर्गाला आपला प्रतिनिधी वाटायचा. ते सारं आज बावळटपणा या सदरात वाटावं इतक्या वेगानं हे सारं बदललं. मुलांचं भावविश्व एक करायला कॉमन स्कूल करावेत की वाउचर पद्धती आणावी यावर वाद होऊ शकतील पण ते नसण्याचा एक परिणाम होतो की, नवी पिढी भावनिक दृष्ट्या कुपोषित होते. त्यांच्या कल्पनेकडचं एक जग त्यांच्या भावविश्वात येतच नाही. भगवान बुद्धांच्या वडिलांनी जसं कोणतंच दु:ख आपल्या मुलाच्या डोळ्याला पडू नये असा प्रयत्न केला तोच प्रयत्न आज सगळे पालक करतायत.

**स्पर्धा परीक्षेची पुस्तकं आणि भूमिकाही**

हे वंचितांचं जग आपल्या मुलांना माहीत व्हावं असा जाणीवपूर्वक प्रयत्नही ते करत नाहीत. हे मी अशासाठी सांगतोय की, हीच मुलं नंतर सरकारी अधिकारी होतात आणि त्यांच्या विकासाच्या कल्पना त्याच उच्च मध्यमवर्गीय जगातल्या असतात. गुळगुळीत रस्ते बनवणं म्हणजे विकास. शहरातल्या घाणेरड्या झोपड्या हटवा. फेरीवाल्यांना हाकला. रहदारीचा प्रश्न जीवनमरणाचा मानणं हे अजेंडा अधिकारी रेटत राहतात. अनधिकृत झोपडपट्टीतली अगतिकता, आदिवासींचं अतिक्रमण या बेकायदा गोष्टींमागची नैतिकता ते समजू शकत नाहीत. या अधिकारीवर्गाच्या भावविश्वात ही कणव कशी संक्रमित करता येईल ही मला सर्वात मोठी समस्या वाटते.

(क्रमशः)

# नादब्रह्माचे सेवक : शंकरबापू आपेगावकर

**मराठवाड्याचे भुमिपूत्र पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांचे पखवाज वादन क्षेत्रात वेगळे अस्तित्व आहे. ९ जानेवारी ही शंकरबापू आपेगावकर यांची पुण्यतिथी त्या अनुषंगाने त्यांची नात प्रज्ञा आपेगावकर यांनी व्यक्त केलेल्या भावना वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.**

**शब्दांजली**

**प्रज्ञा आपेगांवकर**

बापू हे नाव उच्चारताच एक समर्पित, श्रद्धायुक्त व्यक्तिमत्व सर्वांच्या डोळ्यासमोर उभे राहते शंकरराव शिंदे आपेगावकर ऊर्फ बापू या नावाभोवती फार मोठे वलय आहे. ते वलय कठोर परिश्रम, त्याग, श्रध्दा आणि आपुलकीतून आले आहे. लयभास्कर पद्मश्री शंकरबापू आपेगावकर अष्टपैलू व्यक्तिमत्व वर्णन करायचे झाले तर बापू हे संगीत व वारकरी सांप्रदायातील एक आदरयुक्त व्यक्तिमत्व. या लयभास्कराच्या जीवनाकडे दृष्टीक्षेप टाकल्यानंतर त्याचं लईशी नातं केव्हा जोडलं असेल याचा ठाव घेण्याचा जेव्हा आपण प्रयत्न करतो, तेव्हा भागवत सांप्रदायाच्या संत ज्ञानदेव, संत तुकाराम, संत एकनाथ यांच्या गजरातून त्यांचा लयबद्ध बंध जुळतो. बापूंना अधात्माचा वारकरी सांप्रदायाचा वारसा त्यांचे वडील मारोतीराव शिंदे यांच्याकडून परंपरेने लाभला. आमच्या घरात पंढरपूर व आळंदीची एकादशी वारी नियमित होत असे आता बापू नंतर ही वारी पंडीत उध्दवबापू आपेगावकर हे पुढे नेत आहेत. प्रत्येक द्वादशीला आळंदीला वारीनिमित जमलेल्या वारकऱ्यांसाठी शिंदे परिवारातर्फे पंगत आजही अविरतपणे सुरू आहे. शंकरबाबापूंचे मूळ गाव बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील आपेगाव नावाचे छोटे खेडे आहे. बापूंनी वयाच्या आठव्या वर्षी पखावज वादनाला आपेगावमध्ये सुरवात केली. सुरवातीला वारकरी सांप्रदायात भजन, किर्तनातून ते पखावज वादन करीत असत. घरात पखावाजाची कुठलीही परंपरा नाही मात्र तुकोबाच्या लावुनि मृदुंग श्रृति, टाळघोस सेवू भ्रमरस आवडीने या शब्दांनी त्यांना पखावजाकडे खेचले आणि विठ्ठलनाद, विठ्ठलभेद, विठ्ठलछंद, विठ्ठल या पखावाजाच्या छंदात ते रममाण झाले.





आजपासून ऐंशी वर्षापूर्वी एका छोट्या खेड्यातील एक मुलगा पखवाजाचे शास्त्रोक्त शिक्षण घेण्यासाठी उत्तर प्रदेशातील मधुरा येथे जातो आणि गुरूकूल पद्धतीने पखावाजाचे शिक्षण घेण्याची इच्छा गुरू मख्ख्नभैय्या यांच्याकडे व्यक्त करतो. पहिले चार महिने ते शिक्षण तर नाहीच परंतु गुरुजी जवळही बसू देत नसत, गुरुघरी त्यांच्या रिवाजाच्या वेळी गुरुजी जिथे रियाज करत त्या खोलीबाहेर चौकटीवर बसून केवळ श्रोत्याचे काम बापूंनी केले, नाराज न होता, उमेद न करता गुरुजींची अथक सेवा केल्यानंतर गुरूंना पाझर फुटला व शास्त्रोक्त शिक्षण देण्यासाठी तयार झाले. शेकडो कोस दूर एका खेड्यातील मराठी भाषिक एक मुलगा पखवाज् वादक होण्याच्या जिद्दीने आपले खेडेगाव सोडून भविष्याची तमा न बाळगता मथुरेला घरभाषिक प्रांतात जातो ही, आजही अतिशयोक्ती कल्पना वाटू शकते. मात्र त्या काळातली बापूंनी ते करून दाखवले. वयाच्या ४० ते ४७ वर्षापर्यंत गुरुघरी पखवाजाचे शिक्षण घेतल्यानंतर त्या काळातील प्रसिद्ध ध्रुपद गायक झिया मोहीनोद्दिन डागर यांना पखवाजाची साथ सुरु झाली. पखवाजाच्या साथीनिमित्ताने भारतभर अनेक ठिकाणी त्या काळात भ्रमण झाले. भारतातील अनेक मोठ्या नामांकित संगीत महोत्सवातून त्यांनी आपली कला सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. पखवाजाची पहिली थाप प्रेक्षकांची मने जिंकून घेई व ती थापच नादमय स्वर श्रोत्यांच्या कायम स्मरणात राहत असे. पखवाजावर अलगद फिरणारी व थिरकणारी बोटे नादब्रम्हाची निर्मिती करत असत. त्यामाध्यमातून आपल्या वारकरी संप्रदायाची पताका संपूर्ण भारताभर नव्हे तर जगभर अजरामर करून गेले. सन १९८२ साली त्यांच्या पखवाज वादन कलेला भारत सरकारकडून मान्यता मिळाली. त्यांना पद्मश्री ही सन्मानजनक पदवी नवी दिल्ली येथे राष्ट्रपती भवनात बहाल झाली. अव्याहत केलेल्या अथक परिश्रमाला त्या बहुमानामुळे जनमान्यता मिळाली. पंढरीच्या वारीबरोबरच नादब्रम्हाची वारी करणाऱ्या व पखावाजाच्या नादात रममाण होणाऱ्या बापूंनी श्रोत्यांच्या मनात स्थान निर्माण केले. संगीत या नादसेतूच्या म्हणजेच स्वर आणि लयीच्या माध्यमातून जीवा शिवाची सांगड घालणारे विभूती म्हणून बापूंचा क्रम लागतो. संगीत हे मनोरंजन नसून आत्मपरीक्षण करणारी साधना आहे, असे बापू मानत असत. पद्मश्री सारख्या एवढ्या मोठ्या पदवीला हुरळून न जाता कलेची सेवा त्यांनी सोडली नाही. कलेकडे त्यांनी अर्थाजनाचे साधन म्हणून कधीच पाहिले नाही. प्रसिद्धी किंवा पैसा पैकी कोणत्याही लोभाने त्यांनी आपल्या वादन कलेला बाधा आपणारी तडजोड केली नाही. त्यांनी ठरविले असते तर अनेक मजली इमारती, गाडी बंगले ते उभारू शकले असते. परंतु त्या ऐहिक सुखाच्या पाठीमागे न लागता नादब्रह्माची सेवा त्यांनी अविरतपणे सुरू ठेवली. केवळ बीड जिल्ह्याच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र आज बापू गेल्यानंतरही त्यांची आवर्जून आठवण काढतो. मृदुंग वादन क्षेत्रात वेगळे अस्तित्व निर्माण करणारे शंकरबापू आपेगावकर कला क्षेत्रासाठी नव्या कलाकारांसाठी दीपस्तंभ आहेत, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. ९ जानेवारी पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांची पुण्यतिथी त्यानिमित्ताने त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन!



पद्मश्री शंकरबापु आपेगावकर यांचा गौरव करताना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण.

आधुनिक विचारांचे

# वर्तमान



### महाराष्ट्र लसीकरणासाठी सज्ज

मुंबई : राज्यात लसीकरणासाठी यंत्रणा सज्ज करण्यात आली असून अतिशय नियोजनबध्द लसीकरण करण्यात येणार आहे. अशी माहिती राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी एका मुलाखती दरम्यान दिली. लसीकरणासाठी केंद्र, राज्य आणि जिल्हा पातळीवर प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यासाठी आवश्यक ती यंत्रणा सज्ज झाली आहे, अशी माहितीही मंत्री राजेश टोपे यांनी या मुलाखतीत दिली.



# लढवय्या नेत्यांना हवीय 'आमदारकी'

## राष्ट्रवादीच्या शब्दाची समर्थकांना प्रतीक्षा

▶ बाबा श्रीहरी देशमाने

माजलगाव : उपेक्षित घटकांसाठी सदैव संघर्ष करणारे लढवय्ये नेते माधव निर्मळ, बाबुराव पोटभरे, मिलिंद आवाड राष्ट्रवादी काँग्रेसने आमदारकीचा शब्द दिल्याने भविष्यात संधी मिळेल या प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, राष्ट्रवादी हा शब्द पाळणारा पक्ष असून आमच्या नेतृत्वाला योग्यवेळी मानाचे स्थान मिळेल, असा आशावाद या नेत्यांच्या समर्थकांनी 'वर्तमान'शी बोलताना व्यक्त केला.

गेली पंचवीस वर्षे बाबुराव पोटभरे यांच्यासमवेत सावलीप्रमाणे उभे राहणारे त्यांचे खंदे समर्थक श्रीहरी मोरे म्हणाले,



माधव निर्मळ



बाबुराव पोटभरे



मिलिंद आवाड

बाबुराव पोटभरे हे संघर्षमय व्यक्तीमत्व असून बीड जिल्ह्याच नव्हे तर महाराष्ट्रात कोठेही अन्याय झाला की प्रथम ते धावून जातात. बहुजन विकास मोर्चाच्या माध्यमातून युवकांची मोठी फळी त्यांच्या पाठीमागे आहे. त्यामुळे अशा लढावू नेतृत्वाला आमदारकी देवू असा शब्द राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी दिलेला आहे. मात्र इच्छुकांची वाढती यादी लक्षात घेता भविष्यात त्यांना महामंडळाचे अध्यक्ष केले जाईल असा विश्वास मोरे यांनी व्यक्त केला. माधव निर्मळ यांनी उद्योग जगतात वेगळे स्थान निर्माण केले असून शेकडो युवकांच्या हाताला काम मिळवून दिले आहे. त्यांचे समर्थक तथा जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती कल्याण आबुज म्हणाले, माधव निर्मळ यांनी समाजकारणाला अधिक महत्व दिले असून धारूरचे प्रभारी नगराध्यक्ष त्यांचा कार्यकाळ अतिशय प्रभावी राहिलेला आहे. या सर्व जमेच्या बाजू लक्षात घेता आमदार प्रकाश सोळंके यांनी थेट शरद पवारांकडे माधव निर्मळ यांना विधान परिषदेवर घ्या अशी शिफारस केलेली आहे.

### महामंडळावर होणार बोळवण?

**राष्ट्रवादीतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार विधान परिषदेसाठी इच्छुकांची यादी अधिक झाल्याने भविष्यात कोणाची वर्णी लावता येईल याचा पेच पक्षासमोर निर्माण झाला आहे. त्यामुळे आमदारकीसाठी इच्छुक असलेल्या काहींची महामंडळावर वर्णी लावून बोळवण केली जाणार आहे.**

त्यामुळे पक्ष या मागणीकडे सहानुभूतीपूर्वक पाहील याचा विश्वास असून प्रसंगी आमदारकी मिळाली नाही तर महामंडळाचे अध्यक्ष निश्चित होतील.मानवी हक्क अभियानच्या माध्यमातून भटक्या विमुक्त जातींची मोट बांधणारे अभ्यासू नेतृत्व जेएनयुचे प्राध्यापक मिलिंद आवाड यांचे शरद पवारांशी अतिशय सलोख्याचे संबंध आहेत. यावर बोलताना त्यांचे समर्थक तथा मानवी हक्क अभियानचे जिल्हाध्यक्ष राजेश घोडे म्हणाले, मिलिंद आवाड हे तरूण तडफदार आणि अभ्यासू नेतृत्व आहे. ते आमदार व्हावेत अशी कोणी मागणी केलेली नाही. मात्र समाजाची तशी भावना आहे. अशा अभ्यासू नेतृत्वाला विधान परिषदेचेवर घेतले तर उपेक्षितांचा प्रतिनिधी राज्य पातळीवर आवाज उठवेल त्यामुळे मिलिंद आवाड यांना संधी मिळाली पाहीजे. राष्ट्रवादी पक्ष योग्यवेळी योग्य संधी देईल असा दृढ विश्वास राजेश घोडे यांनी वर्तमानशी बोलताना व्यक्त केला.

# ५६६ लाभार्थी; लाभ मात्र डझनभर लोकांनाच

## नगरपालिकेच्या घरकूल योजनाचा अनागोंदी कारभार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव नगर परिषदेने घरकुल योजनेचा गाजावाजा करून ५६६ लाभार्थ्यांची नावे घोषित केली. त्यापैकी फक्त १२ लाभार्थ्यांना त्यांच्या खात्यावर घरकुलाचा हप्ता जमा केला आहे. मात्र, इतर ५५४ लाभार्थ्यांचा हप्ता जमा का झाला नाही असा प्रश्न उपस्थित करीत उर्वरित मंजूर लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाची रक्कम जमा करावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. दरम्यान, लाभार्थी ५६६ लाभ मात्र डझनभर लोकांनाच मिळाल्याने या योजनेतील अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला आहे.

माजलगाव नगर परिषदेमध्ये सत्तांतर होऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या हातात चाव्या असूनसुद्धा घरकुल लाभार्थ्यांना न्याय मिळत नसल्याची स्थिती आहे. घराचे बांधकाम चालू करा, निम्मे काम झाल्यानंतर तुमच्या खात्यामध्ये रक्कम जमा होईल, असे नगर परिषदेच्या वतीने सांगण्यात आले. नगर परिषदेवर विश्वास ठेवून काही लाभार्थ्यांनी



स्वतःचे सोने तोडून, तर काहींनी व्याजाने, उसनवारी करून घर बांधकाम सुरू केले. मात्र, आतापर्यंत फक्त १२ लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली. उर्वरित ५५४ लाभार्थी नगर परिषदेत चकरा मारून बेजार झाले आहेत. मुख्याधिकारी, नगराध्यक्ष व नगरसेवकांनी यात लक्ष घालून घरकुलाच्या लाभार्थ्यांना तात्काळ रकमेचे वाटप करावे, नसता आंदोलनाचा इशारा काँग्रेसने दिला आहे. नगरपालिकेच्या या अनागोंदी कारभारामुळे आश्चर्य व्यक्त केले जात असून याकडे नगराध्यक्ष मंजूर शेख यांनी तात्काळ लक्ष देवून वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी लाभार्थ्यांमधून होत आहे.

# संत विचारातूनच विश्वाचे कल्याण

## ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे यांचे प्रतिपादन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : संत चरित्र, संत विचार विश्वाचा कल्याण साधणारा आहे. सतसंगतीतून परमार्थ वाढीस लागला पाहीजे वारकरी संप्रदायाने मानवता धर्माची बीजे रोवली. त्याचे संगोपन करणे क्रमप्राप्त आहे, असे उद्गार ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे यांनी माजलगाव येथे काढले.

श्री संत ज्ञानदेव संगीत विद्यालय (गुरूकुल) मंजरथ रोड, माजलगाव येथे आयोजित श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा व भव्य किर्तन महोत्सवात काल्याचे किर्तन प्रसंगी ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे बोलत होते. १ जानेवारी ते ८ जानेवारी या कालावधीत किर्तन महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवात विविध नामांकित किर्तनकारांनी आपली सेवा बजावली. श्रीमद् भागवत कथा आपल्या सुमधूर आवाजात संगीत ह.भ.प.अंकिता दिदी माने यांनी सांगून भाविकभक्तांना अध्यात्म आणि त्याचे महत्व विशद करून सांगितले. यावेळी बोलताना ह.भ.प.शिवानंद महाराज शास्त्री म्हणाले, वारकरी संप्रदायाचे महत्त्व अख्या जगाला संत ज्ञानेश्वर महाराजांनी पटवून दिले म्हणून त्यांची किर्ती आजही जगात टिकून आहे. ज्ञानेश्वरांनी सांगितलेले पसायदान जगाच्या कल्याणाची महती सांगते, असे प्रतिपादन शास्त्री महाराज यांनी केले.

या किर्ती महोत्सवात



ह.भ.प.अंकितादिदी माने यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करताना ह.भ.प. शिवाजी महाराज गडदे, ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री.

ह.भ.प.प्रकाश महाराज साठे यांचेही किर्तन झाले. या किर्तन महोत्सवात पत्रकार बालासाहेब फपाळ पाटील, तुकाराम येवले, श्री सिध्दराज अर्बन मल्टीस्टेटचे चेअरमन अशोक सोळंके, धुनकेश्वर अर्बनचे चेअरमन संस्थापक शिवराज यादव, वर्तमान माध्यम समुहाचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रयोजकत्व श्री साईनाथ अलंकारने स्विकारले होते.

## तुळजाभवानी अर्बनचा अनोखा उपक्रम

# पोलीस स्टेशनला वृक्षांची भेट

▶ प्रतिनिधी

माजलगाव : १८व्या शतकात महाराष्ट्रात महिला शिक्षण आणि समाज सुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या १८४ व्या जयंती निमित्त माजलगाव शहर पोलीस ठाण्याला ३८ वेगवेगळ्या वृक्षांसह फुलांच्या झाडांची भेट देण्यात आली. हा अनोखा वृक्षप्रेमी उपक्रम तुळजाभवानी अर्बनच्या वतीने राबविण्यात आला.

सावित्रीबाई फुले यांची १८४ जयंती तुळजाभवानी अर्बन अनोख्या पद्धतीने साजरी केली. कार्यालयात प्रतिमेचे पूजन



करून सावित्रीबाई यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. त्यानंतर शहरातील पोलिस ठाण्याला ३८ वेगवेगळ्या वृक्षांसह फुलांच्या झाडाची भेट देण्यात आली.तुळजाभवानी अर्बनच्या या अभिनव उपक्रमाचे यावेळी पोलिस दलाकडून कौतुक करण्यात आले. दरम्यान यावेळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे सपोनि अविनाश राठोड यांनी बँकेचे चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांचे कौतुक करून त्यांचा सत्कार केला. यावेळी बँकेचे कर्मचारी अशोक मगर, नवनाथ शिंगने, कृष्णा मोरे उपस्थित होते.

### कुलस्वामिनी भंडारे भगवद्गीता पाठांतर स्पर्धेत प्रथम

▶ प्रतिनिधी



माजलगाव : गीता जयंतीनिमित्त मराठवाडा गीता परिवार आयोजित प्राथमिक गटासाठी श्री भगवद्गीता १२ अध्याय पाठांतर स्पर्धेत येथील कु.कुलस्वामिनी शिवशंकर भंडारे (वय १० वर्षे) हिने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. कु.कुलस्वामिनी भंडारे हिने भगवद्गीतेचे १ ते १८ अध्याय मुखोद्गत केलेले आहे. तिला आदिनाथ महाराज शास्त्री कुंडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### बीड येथे सावित्रीमाई फुलेंना अभिवादन



बीड : येथील आम्रपालीनगर येथे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना धम्मज्योती मागासवर्गीय महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा शोभा साळवी, सचिव मायादेवी पारवे, उपाध्यक्षा सुस्मिता डोंगरे, पंचशिला वाव्हळकर, पद्मिनी गायकवाड, सुमनबाई सोनवणे.

# 'दादा' नावाचा राजकारणी

**माजलगाव मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार तथा माजी मंत्री प्रकाश सोळंके यांचा १४जानेवारी हा वाढदिवस प्रकाश सोळंके यांना जिल्ह्यातील आबालवृद्ध दादा नावाने संबोधतात. काय आहे दादा नावाचे रसायन यावर ज्येष्ठ पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने यांनी व्यक्त केलेल्या भावना वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.**

▶ भगीरथ तोडकरी

गेल्या २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मराठवाड्यातील काही मतदारसंघात वार्तांकन करण्याचा योग आला. मात्र बीड जिल्ह्यातील माजलगाव मतदारसंघात 'दादा' नावाचा आदराचा शब्द कानावर पडला. येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार तथा माजी मंत्री प्रकाश सोळंके यांना लहान थोर 'दादा' नावाने संबोधतात. 'दादा' या शब्दात जेवढा भारदस्तपणा तेवढीच माणुसकी ओतपोत भरलेली दिसते. माजलगाव शहराच्या केसापुरीपासून गांवदऱ्याच्या डोंगरपट्ट्यातही 'दादा' नावाचा आदरयुक्त शब्द घुमत राहतो. एका राजकारण्याला दिला जाणारा



एवढा आदर त्यांच्या कामाची, आपुलकीची पोहच पावतीच म्हणावी लागेल. आजमितीला दादा हे माजलगाव मतदारसंघाचे आमदार आहेत. प्रकाश सोळंके मंत्री होते. तरीही त्यांना दादा ही दिलेली उपाधी खूप मोठी आहे असे मला वाटते.

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र सुंदरराव सोळंके यांच्या कर्तृत्वाचा वसा आणि वारसा समर्थपणे पेलवणारे 'प्रकाशदादा' समाजकारणातील एक वेगळे नाव आहे. कुणाला कदाचीत माहीत नसेल दादांना कविता ऐकण्याची, शेतीत रमण्याची, रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची आवड आहे. असा हा वेगळा अवलिया माणूस




राजकारणातील 'दादा' म्हटले पाहिजे. मराठवाड्यात घरातील कर्त्या माणसाला 'दादा' म्हटलं जातं. मोठ्या भावाला मराठवाड्यात बहुतेक ठिकाणी 'दादा' म्हटलं जातं. मात्र दादा हे राजकारणातीलही दादा माणूस ठरले आहेत. प्रकाशदादांनी तरुणाईच्या हाताला काम मिळावं म्हणून एमआयडीसी प्रकल्प आणला, अनेक ठिकाणी बंधारे बांधली. शेती, शिक्षण, आरोग्य, साहित्य, पत्रकारिता या सर्व क्षेत्रात दादांचा वावर असतो. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे काम डोळे दिपणारे आहे. पत्रकार कल्याण निधीसाठी दादांनी भरीव मदत केलीय. सहकार क्षेत्रात दादांचा साखर कारखाना हीच मोठी पोहच पावती आहे. असं कोणतंच क्षेत्र अपवाद नाही, दादांचे तिथे योगदान नसेल. २०१९ ची आयुष्यातील शेवटची निवडणूक असल्याचे दादांनीच घोषित केले होते. या त्यांच्या हाकेला मतदारसंघातील मतदारांनी ओ दिला आणि त्यांच्या आमदार पदावर विराजमान केले. राजकारणात जय–पराजय चालत राहिल मात्र धारूर, वडवणी आणि माजलगाव तालुक्यातील ग्रामीण भागात, वाड्या–वस्त्यांवर प्रकाशदादा नावाचं लोकांवर असलेलं गारूड अफलातून आहे. आबालवृद्धांच्या तोंडून आदराने दादा हे शब्द येतात तेव्हा माझ्यासारख्या पत्रकारालाही दादा हे वेगळं रसायन असल्याची प्रचिती येते. राजकारणातील या दादा माणसाचा १४ जानेवारी रोजी वाढदिवस. प्रकाशदादांना राजकारणातील याहीपेक्षा मोठी जबाबदारी भविष्यात मिळो याच वाढदिवसाच्या शुभेच्छा!

# माजलगाव शहरात २ वर्षात नाट्यगृह उभारणार

## तालुका पत्रकार संघांच्या वतीने आयोजित दर्पण पुरस्कार सोहळ्यात आमदार प्रकाश सोळंके यांची ग्वाही

▶ प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव येथे दि.६ जानेवारी दार्पणदिनी माजलगाव पत्रकार संघाच्या आयोजित दर्पण कार्यक्रमात कोरोना योद्धे,षनारी सन्मान आणि दर्पण पुरस्कारासह माजलगाव भूषण पुरस्काराचे मान्यवरांच्या हस्ते शानदार वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना आमदार सोळंके यांनी माजलगाव शहरात अडीच कोटी रुपयांच्या नाट्यगृहाचे बांधकाम लवकरच सुरु करणार असून दोन वर्षात हे नाट्यगृह परीपूर्ण असेल असे आमदार सोळंके म्हणाले. तर आपली माती आणि आपलं नातं जो जपतो तोच जीवनात यशस्वी होतो मी कायम मानतो असे मत सुप्रसिद्ध सिनेअभिनेते संदीप पाठक यांनी माजलगाव शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात आयोजित दर्पण पुरस्कार कार्यक्रमात व्यक्त केले.



या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रकाश सोळंके, मा.आ.डी.के.देशमुख, मा.आ.मोहनराव सोळंके, भाजपा नेते रमेश आडसकर, बाबुराव पोटभरे, नगराध्यक्ष शेख मंजूर, मिलिंद आव्हाड, नितीन नाईकनवरे, सभापती संभाजी शेजुळ यांची प्रमुख उपस्थिती होती तर यावेळी या कार्यक्रमाची सुरुवात बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संगीत शिक्षक धनंजय जाडे यांनी गायलेल्या स्वागत गीताने झाली. यावेळी माजलगाव भूषण म्हणून सिनेअभिनेते संदीप पाठक तर दर्पण पुरस्कार जेष्ठ पत्रकार संतोष मुळी यांना देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर हे होते. यावेळी कोरोना योध्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये डॉ.सुरेश साबळे, डॉ.अनिल परदेशी, डॉ.श्रेयस देशपांडे, डॉ.श्रीनिवास शिंगणे, डॉ.यशवंत राजेभोसले, डॉ.दत्तात्रय पारगावकर, डॉ.गजानन रुद्रवार, पोलिस निरीक्षक धनंजय फराटे व संतोष पाटील, नगर परिषदेचे मुख्याधिकारी विशाल भोसले यांच्यासह न.प. कर्मचारी विलेश कांबळे, संतोष घागडे, संकेत साळवे यांचा सन्मान करण्यात आला, तर सन्मान नारी शक्तीचा या कार्यक्रमात आष्टी येथील मुख्याधिकारी नीता अंधारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मुंबई येथील अमृता बोरचाटे, सौ.पंचशीला ओव्हाळ, सौ.आशा सिरसट, सौ.अंजली शिंदे व वर्षा पवार, दीपाली गीते यांचाही यावेळी गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की, माजलगाव पत्रकार संघाने आयोजित केलेला हा दर्पण गौरवाचा कार्यक्रम एक सामाजिक बांधिलकीचे जागते उदाहरण आहे. माजलगाव पत्रकार संघातील पत्रकार सातत्याने सामाजिक कार्यात अग्रेसर असतात म्हणून पत्रकारांच्या प्रत्येक कर्यक्रमास मी आवर्जून उपस्थित रहातो. माजलगाव शहरात अडीच कोटी रुपये खर्च करून येत्या वर्षभरात नाट्यगृहाची निर्मिती करणार असून हे नाट्यगृह पूर्ण करण्याचे आश्वासन देवून त्यांनी या नाट्यगृहाला कै.शाम पाठक हे नाव देणार असे जाहिर केले तर सिनेअभिनेते संदीप पाठक म्हणाले की, मी ज्या माती मध्ये जन्मलो आणि ज्या नात्यात वाढलो त्या मातीला आणि त्या नात्याला मी कधीच विसरलो नाही माझ्या आई वडिलांची शिकवण मी कायम लक्षात ठेवली असून जिथे जिथे मी जाईल तिथे तिथे माजलगावच नाव कसे गाजेल याचा प्रथम मी विचार करील नात्याशी आणि मातीशी जो जोडलेला असतो तो जीवनात यशस्वी आणि परिपूर्ण होते असे त्यांनी सांगितले त्याचबरोबर संदीप पाठक यांनी दिलखुलासपणे 'वऱ्हाड निघालाय लंडन'ला यातील काही छटा सादर करून उपस्थिती मंडळींची मने जिंकली. यावेळी मिलींद आवाड, बाबुराव पोटभरे, रमेशराव आडसकर, डॉ.श्रेयस देशपांडे, पोलिस निरीक्षक संतोष पाटील, निता अंधारे, अमृता बोरचाटे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले यांनी केले. सूत्रसंचालन व सत्कारमुर्तीच्या मानपत्रांचे वाचन उपप्राचार्य प्रा.रमेश गटकळ यांनी केले तर आभार कमलेश जाब्रस यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिनकर शिंदे, महेंद्र मस्के, दत्ता येवले, अरविंद ओव्हाळ, जगदीश साखरे, दिगंबर सपकाळ, पांडुरंग कुलथे, निलेश गरूड, राज कोंबडे यांनी परिश्रम घेतले. सामुहिक राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता झाली.



सिने अभिनेते संदिप पाठक यांना माजलगावभूषण पुरस्कार देताना आमदार प्रकाश सोळंके व पत्रकार बांधव




# सिंदफणा स्कूलला सीबीएसई ज्युनिअर कॉलेजची मान्यता

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील सिंदफणा पब्लिक स्कूल हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षणाची क्षितिजे खुली करत मागील १८ वर्षापासून कार्यरत आहे. साहित्य, खेळ ,संगीत, नृत्य नाटक अशा विविध कृतिशील उपक्रमांमधून अध्ययन व अध्यापन प्रक्रिया केली जाते. विद्यार्थ्यांना ओझे वाटण्याऐवेजी एक आनंद देणाऱ्या शिक्षणाला शाळेमध्ये महत्व दिले गेले आहे.

दहावीनंतर पुढील उच्च शिक्षणासाठी (ज्युनियर कॉलेज संधी उपलब्ध करुन देण्यासाठी पालकांकडून वारंवार विचारणा केली जात होती. यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षात सी.बी.एस. ई.बोर्ड दिल्ली. यांच्याकडे उच्च शिक्षणाच्या सुविधेसाठी इयता अकरावी व बारावीच्या मंजुरीसाठी परवानगी प्रस्ताव दाखल केला आणि वारंवार पाठपुरावा केला गेला. परंतु कोविड १९ या आपत्तीमुळे शालेय तपासणीत अडथळा येऊन बराच वेळ गेला. त्यानंतर सदर कार्यालयाने दखल घेत ऑगस्ट महिन्यात व्हिडिओद्वारे शालेय तपासणी घेतली. दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी सी.बी.एस.ई.बोर्ड दिल्ली यांनी मंजुरीचे पत्रक ई-मेल द्वारे पाठवले. आता माजलगाव तालुक्यातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण हे सिंदफणा ज्यूनियर कॉलेज या माध्यमातून मिळेल. दिनांक १ एप्रिल २०२१ पासून इयता अकरावीच्या वर्गाचे क्लासेस सुरू होतील तर २०२३ मध्ये बारावी बोर्डाची परीक्षा घेतली जाणार आहे. पुढील उच्च शिक्षणाची सुविधा मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, इतर कोणत्याही माध्यमातील व बोर्डातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. या संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन शाळेचे प्राचार्य अजित माळी यांनी केले आहे. या संस्थेच्या माध्यमातून माजलगाव तालुक्याचा सर्वागीण विकास व शैक्षणिक कायापालट करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके व संस्थेच्या सचिव तथा जिल्हा परिषद सदस्या सौ.मंगलाताई सोळंके यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. शाळेच्या समुपदेशक नीलाताई देशमुख, प्राचार्य अजित माळी, उपप्राचार्य राहुल कदम, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी मान्यतेसाठी परिश्रम घेतले.

## धर्मनाथ अर्बनचे नूतन वास्तूत स्थलांतर



माजलगाव : येथील धर्मनाथ अर्बनच्या नुतन वास्तूत स्थलांतर सोहळा ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी धर्मनाथ अर्बनचे अध्यक्ष लहुराव जोगडे, मुकुंद जोगडे, व्यवस्थापक विजय मते.




# माजलगाव न्यायालयात विधिज्ञ कक्षाचे उद्घाटन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील जिल्हा आणि सत्र न्यायालयात मंगळवार रोजी विधिज्ञ लोकांना दैनंदिन कामकाजासाठी तयार करण्यात आलेल्या विधिज्ञ कक्षेचे अति.जिल्हा न्यायाधीश अरविंद वाघमारे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर आर.के.गुज्जर हे होते.

प्रमुख उपस्थितीमध्ये दिवाणी न्यायाधीश क.स्तर पी.ए.वाघमारे, जाधव, लंक्केश्वर हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड.अखिल घाडगे यांनी केले, तर सूत्रसंचालन ॲड.आर.ए.निसर्गध यांनी तर आभार ॲड.नाईकवाडे यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड.विवेक शिंदे यांच्यासह विधीज्ञांनी मेहनत घेतली.

# माळरानची 'चांडाळ चौकडी' नाबाद शंभर

## लक्षवेधी भूमिकेत गंगामसल्याचा सोन्या सोळंके

▶ प्रतिनिधी

माजलगाव : लक्षवेधी भूमिकेत गंगामसल्याचा सोन्या सोळंके दिग्दर्शक नवनाथ ढमे यांच्या बहुचर्चित चांडाळ चौकडी या वेबसीरीजने एपिसोडची शंभरी गाठली असून मंगळवार १२ जानेवारी रोजी चांडाळ चौकडीचा शंभरावा भाग प्रदर्शित होणार आहे. या मालिकेत लक्षवेधी भूमिकेत माजलगाव तालुक्यातील गंगामसला येथील सोन्या सोळंके चमकत आहे.

वेबसिरीज विश्वात चांडाळ चौकडीने वेगळे स्थान निर्माण केले आहे. १९ फेब्रुवारी २०१९ रोजी चांडाळ चौकडीचा पहिला एपिसोड प्रसिद्ध झाला. त्यानंतर लोकप्रियतेचे उच्चांक या मालिकेने गाठले आहेत. चांडाळ चौकडीची केवळ १० कलाकारांची टीम आहे, त्यात नवनाथ ढमे (तात्या), मॉन्टी चव्हाण (नासका सुन्या), रमेश मैंद (राघू), प्रेम नरसाळे (पोपट), लक्ष्मण आहीरे (बबन), सोन्या सोळंके (जर्शी गण्या), पूजा ढमे (मोना), किरण नेवारे (मैना) आदी प्रतिभावंत नवोदित कलाकार आपली कला मालिकेच्या माध्यमातून जगासमोर सादर करीत आहेत. या मालिकेत गंगामसला येथील सोन्या सचिनराव सोळंके हा जर्सी गण्या या वेगळ्या आणि अफलातून भूमिकेत दिसत आहे. त्याचबरोबर बीड जिल्ह्यातील आणखी एक उमदा कलाकार मैंदवाडी ता.धारूर येथील रमेश मैंद हा राघू या भूमिकेत झळकत आहे. दिग्दर्शक तथा लेखक नवनाथ ढमे आणि निर्माते सचिन शिंदे यांनी चांडाळ चौकडीची अप्रतिम निर्मिती केली आहे. हरहुन्नरी आणि नवोदित कलाकारांना शोधून चांडाळ चौकडीची चांगलीच भट्टी जमली आहे. सोशल मिडीया विश्वात आजमितीला चांडाळ चौकडीने वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे.




चांडाळ चौकडीतील कलाकार सोन्या सोळंके आणि रमेश मैंद.

### व्ह्यूजची कोटी-कोटी उड्डाणे

चांडाळ चौकडी या वेबसिरीजने सोशल मिडीया विश्वात




नाव उच्चांक प्रस्थापित केला आहे. आज शंभराव्या एपिसोडकडे वाटचाल करत असताना या मालिकेला ६ कोटी ६२ लाख ६७५३ व्ह्यूज अर्थात प्रेक्षकांची पसंती मिळाली आहे, ही बाब आम्हा कलाकारांसाठी प्रेरणा देणारी आहे, अशी प्रतिक्रिया सोन्या सोळंके अर्थात मालिकेतील जर्शी गण्या याने वर्तमानशी बोलताना दिली.

आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, ■ **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**